# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक २०/०३/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक २०/०३/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम व पाणी पुरवठा विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र | विषय |
|---|---|
| | बांधकाम विभाग |
| १ | अग्निशमन सेवा योजनेअंतर्गत अग्निशमन वाहनाकरिता पाणीपुरवठा आवारात शेड उभारणे व गेट बसविण्याबाबत. |
| २ | मलकापूर न.प. हद्दीतील T.P. स्कीम नं. १ मधील प्लॉट क्र. २४८ वरील अभ्यासिके करिता वाढीव निधीस मान्यता मिळणे बाबत व अंदाजपत्रकातील जास्तीच्या बाबींना मान्यता मिळणे बाबत. |

---

**विषय क्र.१ :- अग्निशमन सेवा योजनेअंतर्गत अग्निशमन वाहनाकरिता पाणीपुरवठा आवारात शेड उभारणे व गेट बसविण्याबाबत.**

वरील विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार न.प.च्या मालकीचे २ अग्निशमन वाहन असून त्यांच्या करिता पाण्यापुरवठा आवारामध्ये अग्निशमन सेवा योजनेअंतर्गत शेड उभारणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच आवश्यक त्यावेळी महेश अर्बन संस्थेकडून बुलढाणा रोडवर ये-जा करण्याकरिता पाणीपुरवठा आवारात नवीन गेट बसविणे आवश्यक आहे जेणेकरून अग्निशमन वाहन तातडीने मुख्य रस्त्यावर येऊन घटनास्थळी पोहोचण्यात मदत होईल. त्यामुळे सदर कामाच्या कार्यवाहीस व येणारा खर्च अग्निशमन सेवा योजनेअंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.२ :- मलकापूर न.प. हद्दीतील T.P. स्कीम नं. १ मधील प्लॉट क्र. २४८ वरील अभ्यासिके करिता वाढीव निधीस मान्यता मिळणे बाबत व अंदाजपत्रकातील जास्तीच्या बाबींना मान्यता मिळणे बाबत.**

वरील विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सा. बां. विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१७/प्र.क्र.१२१(भाग-२)/इमारती-२ दि. २७/०९/२०२२ नुसार वस्तू व सेवा कर हा बांधकाम सेवांसाठी १८% (९% CGST + ९% SGST) असा दर निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार त्यातील मुद्दा क्र. २ नुसार चालू कामाची देयके सद्यस्थितीत चालू कामाची निविदा व वस्तू सेवा कर वगळून मागविण्यात आलेल्या आहेत. अशा कामाची देयके १२% वस्तू व सेवा कर परीगणित करून अदा करण्यात येतात. आता अशा चालू कामांची देयके निविदा अटी व शर्तींच्या अधीन राहून बदललेल्या १८% वस्तू व सेवा करानुसार

पारित करावी असे नमूद असून त्यानुसार कंत्राटदारास वस्तू व सेवा कराचे १२ % अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत केलेले आहे व उर्वरित ६ % करिता निधी मागणी करावी लागेल किंवा शासन स्तरावरून अनुदान प्राप्त झाल्यानंतर सुधारित अंदाजपत्रक तयार करून सुधारित प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार असल्याचे नमूद केले आहे.

तसेच सदरचे काम हे जी प्लस टू स्वरूपाचे असून प्रगती प्रथावर आहे व त्याचे डिझाईन कन्सल्टंट यांनी तयार केले असून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे येथून त्याचे प्रूफ चेकिंग सुद्धा करून घेण्यात आले आहे. त्यामुळे सळई डिझाईन प्रमाणे घेणे आवश्यक आहे परंतु सदर कामाचे अंदाजपत्रकात बाहेरील प्लास्टरचे व सळईचे प्रमाण कमी दर्शवण्यात आले आहे आणि कमी प्रमाणात वापरल्यास इमारत ही कमकुवत होऊ शकते म्हणून सदर कामात सळईचे प्रमाण डिझाईन प्रमाणे घेणे गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये ओपन टेरेस असून पावसाच्या दृष्टीने त्यावर शिट कव्हर घेणे जरुरीचे आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता सुधारित अंदाजपत्रक तयार करून त्यामध्ये उर्वरित बाबी अंतर्गत करून अंदाजपत्रक तयार करण्यास किंवा वाढीव कामासाठी व GST च्या रकमेसाठी नवीन अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यते करिता पाठवण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**